Exh. 9

रे.क.नं. २०/२०२६

**मे. दिवाणी न्यायाधिशसाो, कनिष्ठ स्तर, कागल**
**यांचे न्यायालयात .......**

**शहाजी संतू उर्फ संतराम पोवार,**
व.व.५८, धंदा : नोकरी,
रा. घर नं. ३६२, सोनाळी, ता. कागल, जि. कोल्हापूर
} वादी

विरूद्ध

१) **अहिल्याबाई संतू उर्फ संतराम पोवार,**
व.व.५९, धंदा : अंगणवाडी सेविका,
रा. घर नं. ३६२, सोनाळी, ता. कागल,
जि. कोल्हापूर

२) **अनिल संतू उर्फ संतराम पोवार,**
व.व.५७, धंदा : नोकरी,
सध्या रा. घर नं. ३६२, सोनाळी, ता. कागल,
जि. कोल्हापूर
कायम रा. प्लॉट नं. ४०२, श्री. उमा हाईट्स
बिल्डिंग रेजेसि इन्टेट रोड, पाटीदार भवनच्या मागे,
सेंट जॉन स्कुलच्या समोर दावडी, गोळवली,
डोंबिवली, पु. मुंबई ४२१ २०२३

३) **शंकुतलाबाई भिमराव मोरे**
व.व.६०, धंदा : अंगणवाडी सेविका,
रा. म्हाळुंगे, ता. करवीर, जि. कोल्हापूर
} प्रतिवादी

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

| | | |
|---|---|---|
| **४)** | **चंद्रकांत संतराम पोवार, म.वा.,**<br>**सुमित चंद्रकांत पोवार उर्फ चांभार,**<br>व.व.३५, धंदा : गवंडी काम,<br>रा. घर नं. ३६२, सोनाळी, ता. कागल,<br>जि. कोल्हापूर | प्रतिवादी |
| **५)** | **ग्रामसेवक/सरपंच**<br>सोनाळी, ता. कागल, जि. कोल्हापूर | |

**दावा – फेर तात्पुरती मनाई ताकीदीकरीता अर्ज स्पेसिफिक रिलीफ ॲक्टचे कलम ३७ व आदेश ३९ नियम १ सी.पी.सी. १९०८ प्रमाणे**

यातील वादीचा फेर तुर्तातुर्त मनाई अर्ज असा की,

१) यातील वादींनी उपरोक्त प्रतिवादी नं. १ ते ५ यांचेविरुद्ध या न्यायालयामध्ये दि. ११/०२/२०२६ इ. रोजी तात्पुरती मनाई अर्ज दाखल केलेला होता. सदरचे अर्जावर मे. कोर्टाचा दि. ११/०२/२०२६ इ. रोजी नोटीस पाठविण्याचा आदेश झालेला आहे.

२) यातील घर मिळकत म्हणजे सोनाळी, ता. कागल, जि. कोल्हापूर येथील न.भू. नं. ४२० घर नं. ३६२ क्षेत्र ३३.७० चौ.मी. चे दगड वीटा मातीचे बांधलेले साधे घर आहे.

३) यातील प्रतिवादी नं. १ ते ५ यांना दि. ११/०२/२०२६ इ. रोजी मे. कोर्टाचा नोटीस पाठविणेचा आदेश झालेला आहे. त्याप्रमाणे, प्रतिवादी नं. १ ते ३ यांना आजरोजी नोटीस पाठविण्याची होती. परंतू, यातील वादी हे दि. १२/०२/२०२६ इ. रोजी सकाळी ८ वाजता वरील घरच्या पत्त्यावर सोनाळी येथे गेले असताना यातील प्रतिवादी नं. १ ते ४ हे दांडगाव्याने व हुकूमशाही पद्धतीने घर पाडण्यास सुरूवात केली असल्याचे दिसले. त्यावेळी वादी प्रतिवादी नं. १ ते ४ यांना ''घर पाडू नका, आपण त्या घरामध्ये राहत आहोत, माझे नुकसान करू नका'' असे म्हणले असताना सुद्धा प्रतिवादी नं.

Assit. Supdt.
Kagal

१ ते ४ यांनी न ऐकता न जुमानता घर पाडण्यास सुरूवात केली व जे.सी.बी. लावून सर्व घर पाडण्यात आले आहे असे वादींना दिसले. यावरून प्रतिवादी नं. १ ते ४ हे गुंड प्रवृत्तीचे व कायदा न जुमानणारे लोक आहेत असे दिसून येते.

४) असे प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी बेकायदेशीर व मनमानी घर पाडले असल्याने वादीचे कधीही न भरून येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे.

५) **यावरून वादींची मे. कोर्टास विनंती की,**

अ) यातील प्रतिवादी नं. १ ते ४ यांना सत्वर तात्पुरती मनाई आदेश व्हावा.

ब) जरूर तर अर्ज दुरूस्तीस परवानगी मिळावी.

क) अन्य न्यायाचे सर्व दादी याच कामी वादींच्या बाजुने व्हाव्यात.

येणेप्रमाणे अर्ज असे.

कागल

दि. १२/०२/२०२६

Drafted & Presented by

वादी

Adv. Sunil Shrikant ~~Jadhav~~ Babar.

## प्रतिज्ञा

मी यातील वादी शहाजी संतु उर्फ संतराम पोवार, व.व. ५८, धंदा – नोकरी, रा. घर नं. ३६२, सोनाळी, ता. कागल, जि. कोल्हापूर अशी प्रतिज्ञा करतो की, वरील अर्जातील संपूर्ण मजकूर माझे स्वतःच्या माहितीप्रमाणे, समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा. आज मु।। कागल दि.१२/०२/२०२६

Asstt. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

## ॲफिडेव्हिट

मी यातील वादी शहाजी संतु उर्फ संतराम पोवार, व.व. ५८, धंदा – नोकरी, रा. घर नं. ३६२, सोनाळी, ता. कागल, जि. कोल्हापूर शपथपूर्वक कथन करते की, वरील अर्जातील संपूर्ण मजकूर माझे स्वतःचे माहितीप्रमाणे, समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हिट. आज मु।। कागल

दि. १२/०२/२०२६

मी ॲफिडेव्हिट करणार यांना ओळखतो.

ॲड. सुनिल श्रीकांत बांबर

## प्रतिज्ञा

मी यातील वादी शहाजी संतु उर्फ संतराम पोवार, व.व. ५८, धंदा – नोकरी, रा. घर नं. ३६२, सोनाळी, ता. कागल, जि. कोल्हापूर अशी प्रतिज्ञा करतो की, वरील ॲफिडेव्हिटमधील संपूर्ण मजकूर माझे स्वतःच्या माहितीप्रमाणे, समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा. आज मु।। कागल

दि.१२/०२/२०२६




Solemnly Affirmed before me by
Shri. Shahaji Santu @ Santram powar
Age 58 of Sonali, Kagal who is
identified by Shri S.K. Babare
............whom I know personally
Dated :- 12/2/26

Assistant Superintendent

MADKE AJIT BHISHMA

Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.02.13 16:50:36 +0530